'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

# भटक्या व विमुक्त समाजाच्या आर्थिक समस्या

प्रा. डी. डी. पाटील
डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव जि. सातारा (महाराष्ट्र)

**प्रस्तावना—**

भटके हा शब्द 'नोमॅड' या इंग्रजी शब्दाचे रुपांतर आहे. नोमॅड हा शब्द नेमो या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे. नेमो म्हणजे पशुपालक. यामधून विविध भटक्या जमातींचा समावेश असून समाजामध्ये आजही असंख्य जाती वंचित म्हणून जीवन जगतात. जीवन जगणं म्हणजे काय याचाही बोध न झालेल्या आणि कलियुगातील सबलीकरण, विकास, उच्च शिक्षण इ. विषयाचा लवलेशही नसणाऱ्या परंतु आपल्या जीवनावश्यक गरजाही न भागवू शकणाऱ्या भटक्या व विमुक्त समाजातील अनेक जातींचा समावेश होतो. विविध देशात हे प्रमाण कमी जास्त दिसून येते. भारताबाबत विचार करायचा झाल्यास एकीकडे इंडियामध्ये उच्चभ्रू लोक डामडौलात राहताना दिसतात. तर खऱ्या भारतामधील मोठया प्रमाणावर लोक आजही पायाभूत सुविधांच्या अभावामुळे सातत्याने विविध समस्यांना सामोरे जाताना दिसतात. यामध्ये भटक्या व विमुक्त समाजातील लोक मोठया प्रमाणात आहेत. भटक्या जातीमधील प्रामुख्याने जाणवणाऱ्या व दिसणाऱ्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे व त्याबाबत उपाययोजना सुचवणे हा शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश—**

१. भटक्या जमातींची संकल्पना समजावून घेणे.
२. भटक्या विमुक्तांची सद्यस्थिती समजावून घेणे.
३. भटक्या विमुक्तांच्या विविध आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
४. भटक्या विमुक्तांच्या विविध आर्थिक समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. प्राथमिक साधनामध्ये विविध भटक्या जमातीमधील लोकांच्या मुलाखतीद्वारे समस्या जाणून घेण्यात आल्या. तसेच दुय्यम साधनामध्ये विविध साहित्य, कादंबऱ्या, आत्मकथने, रिपोर्ट इ.चा अभ्यास करण्यात आला.

**भटक्या जमातींची संकल्पना—**

भटक्या जमातीमध्ये विविध प्रकार असून त्यामध्ये प्रामख्याने नाथपंथी डवरी, डोंबारी, घिसाडी, वैदू, वडार, पारधी, गोसावी, माकडवाला, कांजारभाट, बेलदार, नंदीवाले, भोई, मदारी, फकीर, रामोशी, गोंधळी, गोपाळ, लमाण इ. सह अनेक पोटजाती आढळून येतात.

**भटक्या विमुक्तांची सद्यस्थिती—**

भटक्या विमुक्तांची सद्यस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर अत्यंत विदारक दृश्य आपल्याला आढळते. २१ व्या शतकात एकीकडे मूलभूत गरजा या इंटरनेट, ग्लोबल व्हिलेज, अन् जग हीच बाजारपेठ इ. बदलत्या दिसत असताना भटक्या व विमुक्त समाजाचे पाण्यासाठी, आरोग्यासाठी आणि जीवनाची प्राथमिक

Attested by
Principal
D. P. Bhosale College
Koregaon (Satara)

ISSN : 2348-7143
March-2019

लढाई लढण्यासाठी बहुतेक आयुष्य खर्च होताना दिसते. या सद्यस्थितीवरुन पुढील आर्थिक समस्या लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.

भटक्या जमातीच्या आर्थिक समस्या–

१. **शासकीय योजनांची अपुरी अंमलबजावणी व अपुरी माहिती–**

या समाजातील बहुतांशी लोक शिक्षणापासून वंचित आहेत. त्यामुळे त्यांना विविध शासकीय योजनांची माहिती होत नाही. तसेच शासकीय पातळीवर या समाजाला मिळणाऱ्या योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत नसल्यामुळे आर्थिक अडचणी वाढताना दिसतात.

२. **अशैक्षणिक वातावरणामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्या–**

भटक्या समाजातील मुलांना शिक्षणविषयक योग्य मार्गदर्शन नसल्यामुळे व शिक्षण घेणे अशक्य असल्यामुळे तसेच शिक्षणविषयी नकारात्मक दृष्टिकोण असल्यामुळे नोकरीच्या संधी कमी व त्यामुळे आर्थिक समस्या वाढताना दिसतात.

३. **पारंपारिक व्यवसायातील आर्थिक अडचणी–**

विविध भटक्या जमातीतील लोक पारंपारिक व्यवसाय करत आहेत. परंतु पारंपारिक व्यवसाय आधुनिक काळात टिकुन राहत नसल्यामुळे तसेच त्यामध्ये उत्पन्नाची मर्यादा असल्यामुळे मोठया प्रमाणावर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

४. **अस्थिर जीवनामुळे बॅंक कर्जे मिळण्यात अडचणी–**

५. भटक्या व विमुक्त समाजाचे जीवन अस्थिर असल्यामुळे तसेच कर्ज वसूलीविषयी बॅंकांचा नकारात्मक दृष्टिकोण असल्यामुळे विविध बॅंकांकडून त्यांना कर्जे मिळत नाहीत. बऱ्याचवेळा कर्जासाठी जामिनदार मिळत नाहीत. त्यामुळे आर्थिक समस्या वाढताना दिसतात.

६. **सावकारी कर्जे परतफेडीमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्या–**

अपुरे उत्पन्न व वाढता खर्च याचा मेळ घालण्यासाठी सोपा वाटणारा पण गळयाभोवती व्याजाचा फास आवळणारा सावकारी कर्जे स्वीकारणे हा पर्याय अनेक कुटुंबांकडून स्विकारलेला दिसतो. परंतु त्यामुळे आर्थिक समस्या सुटण्याऐवजी वाढत जाताना दिसतात.

७. **पालकांमधील जागरुकतेचा अभाव–**

शिक्षण, आधुनिकतेची कास इ. बाबत पालकांमध्ये माहिती नसते. त्यामुळे मुलांना विविध आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

८. **उत्पन्नाची अपुरी साधने व आर्थिक समस्या–**

पारंपारिक व्यवसाय, धंदे यामधील उत्पन्नाला मर्यादा असल्यामुळे या समाजातील लोकांना मोठया प्रमाणावर आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

९. **अंधश्रद्धांमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्या–**

या समाजातील बहुसंख्य लोक अंधश्रद्धेला बळी पडलेले दिसून येतात. देव धर्म, कर्मकांड, नवस सायास इ. साठी मोठया प्रमाणावर खर्च होताना दिसतो. त्यासाठी सावकारी कर्जे व त्यावरील व्याज अश्या दुष्ट चक्रामध्ये हा समाज अडकलेला आहे.

१०. **आर्थिक समस्यांमुळे जीवनमानाचा खालावलेला दर्जा–**

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Issue 171 (B)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

वरील विविध आर्थिक समस्यांमुळे या समाजातील लोकांचे जीवनमान खालावलेले असून कमी उष्मांक आहार, आरोग्यविषयक अडचणी इ. समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसून येतात.

११. **व्यसनाधीनता व आर्थिक समस्या–**

व्यसनाधिनतेमुळे लोकांच्या आर्थिक समस्या वाढतच असून दिवसागणिक त्यात भर पडत आहे.

१२. **पायाभूत सुविधांच्या अभावामुळे होणाऱ्या आर्थिक समस्या–**

आरोग्य, वीज, पाणी, दळणवळण इ. पायाभूत सुविधाही या समाजातील लोकांना पुरेश्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे त्यासाठी काही वेळा जादा खर्च करावा लागतो. त्यामुळेही आर्थिक समस्यामध्ये भर पडत आहे.

१३. **समाजातील दुय्यम स्थानामुळे होणारी आर्थिक कुचंबणा–**

समाजातील अन्य घटकांकडून भटक्या व विमुक्त समाजातील लोकांना बऱ्याचवेळा हीन व दुय्यम वागणूक मिळत नसल्यामुळे उदा. उधारीला नकार, जादा दराने उधारीवर विक्री इ. आर्थिक कुचंबणा होताना दिसते.

**आर्थिक समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना–**

१. **शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी–**

या समाजातील लोकांना असणाऱ्या शासकीय योजनांची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक कुचंबणा थांबणे शक्य होणार आहे.

२. **शिक्षणविषयक जागृतीची गरज–**

अजूनही शिक्षणविषयक जागृती पुरेश्या प्रमाणात होणे गरजेची आहे. शिक्षणाची खरी गरज या समाजातील लोकांना झाल्यास आर्थिक समस्या सुटण्यास मदत होणार आहे.

RESEARCH JOURNEY

३. **पायाभूत सुविधांची प्रभाची उपलब्धता–**

मोफत व दर्जेदार आरोग्य सुविधा, प्रभावी दळणवळण, पाणी, वीज इ. पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यास त्यामुळेही आर्थिक समस्यांवर या समाजातील लोकांना मात करणे शक्य होणार आहे.

४. **अंधश्रद्धा निर्मुलनासाठी ठोस व सातत्यपूर्ण उपायांची आवश्यकता–**

अंधश्रद्धेच्या विळख्यातून या समाजाला बाहेर काढण्यासाठी सातत्यपूर्ण व ठोस उपायांची आवश्यकता आहे. असे झाल्यास विनाकारण होणारा खर्च कमी होवून आर्थिक स्थिती सुधारण्या मदत होणार आहे.

५. **कौशल्य विकास व उद्योजकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी–**

या समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी कौशल्य आधारीत विविध योजनांची नियोजनपूर्ण अंमलबजावणी करणे गरजेचे असून कमी दरात व्यवसायासाठी कर्जपुरवठा, व्यवसायासाठी योग्य अनुदान इ. योजना राबवल्यास उद्योजकता विकास व आर्थिक विकास होणे शक्य आहे.

५. **समाजाच्या सकारात्मक दृष्टिकोनाची गरज–**

भटक्या व विमुक्त समातीजील लोकांप्रती समाजातील अन्य घटकांचा सकारात्मक दृष्टिकोण फार गरजेचा आहे. त्यामुळेही आर्थिक कुचंबणा कमी होणे शक्य होणार आहे.

६. **सामाजिक अस्थिरता कमी करण्यासाठी प्रोत्साहन–**

या समाजातील लोकांच्या आर्थिक समस्येला अस्थिरता हा मुख्य घटक कारणीभू आहे. सामाजिक अस्थिरता कमी करण्यासाठी योग्य प्रयत्न होणे गरजेचे आहे.

स्त्री देव, धर्म, भ्रामक कल्पना व अनिष्ठ रूढी, परंपरा, सामाजिक जाच, पोलिसांचा छळ यात पिळवटून निघाली आहे. अशा स्त्री जीवनाचे चित्रण भटक्या जमातीच्या आत्मकथनातून ठायी ठायी व्यक्त झाले आहे.

स्त्री–पुरूषांना अहोरात्र काम करीत राहणे, मुलांसाठी शाळा नाहीत, पोटासाठी दिसेल त्या वस्तूची चोरी करणे, गाव स्वच्छ करणे, मेलेले जनावर गावाबाहेर नेणे अशी हलकी कामे करावयाची आणि ते विसरण्यासाठी दारू पिणे, आर्थिक सामाजिक लढाई करावी लागणे हे सारे थांबले पाहिजे ही या भटक्यांच्या साहित्याची मागणी आहे. त्यांच्या या आत्मकथनांमध्ये परिवर्तनाची प्रचंड उर्मी आहे. नव्या व्यवस्थेची संरचना करण्याचा प्रयत्न भटक्या विमुक्तांच्या जमातीच्या साहित्याने केला आहे. अशा प्रकारचा आशावाद भटक्यांच्या आत्मकथनांमधून दिसून येतो आहे. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची जाणीव त्यांनी आत्मकथनातून करून दिली आहे.

संदर्भ –

१. समाज आणि साहित्य – डॉ. सदा कऱ्हाडे, लोकवाङ्मय गृह मुंबई, तिसरी आवृत्ती, मार्च २००७.
२. १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह – डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च २००१.
३. साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह – डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिलिपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे, प्रथम आवृत्ती, २००७.
४. आत्मकथा काटेरी तारेच्या कुंपणाची – भिमराव जाधव, चंद्रकला प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती, १९९८.